# स्मृतींचे तरंग - ' जीवन रंग'

अयोध्येमधे मूळ स्थान असलेल्या चालुक्य वंशीय जयसिंह उर्फ विजयादित्य याने प्रथम दक्षिणेतील पालव वंशीय राजावर स्वारी केली व तेंव्हा सहाव्या शतकापासून या चालुक्य वंशाच्या दक्षिणेतील कारकीर्दीस प्रारंभ झाला. जयसिंहाचा शूर मुलगा रणराग याने आपली राजधानी विजापूर जिल्हयात बदामी येथे केली. कोकण, गुजराथ, माळवा, मुंबई जवळचे घारापुरी आदि आपल्या अंमलाखाली आणून चालुक्य उर्फ साळुंखे वंश दक्षिण भारतात सार्वभौम झाला. या साम्राज्यामधे इ.स. ७५३ नंतर झालेली आक्रमणे व युध्दे या मुळे प्रचंड उलथापालथी घडत राहिल्या. हे राज्य संपुष्टात आल्यानंतर या वंशातील वीर ठिकठिकाणी जाऊन राहिले. या पैकी इ.स. १५२६ मधे आदिलशहाच्या पदरी राहिलेल्या साळुंखे सरदार तुकोजीरावाने रत्नागिरी किल्ला सर केला. या शौर्याबद्दल विजापूरच्या बादशहाने खूष होऊन रत्नागिरी व आसपासचा प्रदेश तुकोजीरावांना बहाल केला. तुकोजीरावांच्या नातवाने, कुक याने रत्नागिरी तालुक्यातील मिऱ्या येथे वास्तव्य केले. श्री छत्रपती शिवाजी महाराजांनी कोकण प्रांताकडे मोहरा वळवल्यानंतर सावंत-साळुंखे कुळातील वीर पुरुष शिवाजी महाराजांच्या फौजेत दाखल झाले. त्यापैकी महाराजांच्या तुकडीचे नायक असलेले मिऱ्या येथील बळवंत सावंत शृंगारपूरच्या लढाईत कामी आले. या घराण्याचा वारसा सांगणाऱ्या सावंतांच्या जाकी मिऱ्या गावामधे माझ्या वडिलांच्या आजोबांनी म्हणजे माझे पणजोबा कै. जीवनराव अर्जुन सावंत यांनी आमचे हे घर बांधले.

साधारणपणे १८८० च्या सुमारास, जीवनरावांनी आपल्या भावास मूळ घर देऊन, त्या बदल्यामधे मूळ घराच्या खालील बाजूस असलेल्या सुमारे ६ ते ७ गुंठे जमिनीवर हे घर बांधले. मुळामधे मिऱ्या गांव, ज्या गावाला 'मिऱ्या बंदर' म्हणून ओळखले जाते, ते हे गांवच कोकणातील अनेक निसर्गसुंदर गावांपैकी एक ! किनाऱ्यालगत असलेला 'भाटी मिऱ्या', डोंगराच्या पायथ्याशी असलेला 'जाकी मिऱ्या' व डोंगराच्या वरचा भाग सडा-मिऱ्या म्हणून ओळखला जातो. चहू बाजूनी समुद्र किंवा खाडी असलेल्या या गावामधे जाण्यास एकच रस्ता व या रस्त्याच्या एका बाजूला खाडी व दुसऱ्या बाजूला समुद्र ! नारळी-पोफळी व हापूस आंब्यांच्या कलमांनी नटलेल्या या गावामधे प्रवेश करणाऱ्या रस्त्यालगत डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या आमच्या घराच्या नुसत्या दर्शनाने जाणाऱ्या-येणाऱ्या सर्वांचेच मन प्रफुल्लित होते. आमचे हे सुंदर घर बांधणारे माझे पणजोबा जीवनराव सावंत हे ब्रिटीश काळामधे 'कोतवाल' म्हणून पोलीस खात्यामधे नोकरीस होते. नोकरीतील बराचसा काळ त्यांनी कर्नाटकामधे, बेळगांव, धारवाड, विजापूर या प्रदेशामधे घालविला. तेथे धुमाकूळ घालणाऱ्या दरोडेखोर टोळयांचा बंदोबस्त करण्याचे काम त्यांच्याकडे होते. पैशाला बहुधा

त्यांचेकडे कमतरता नसावी. जीवनरावांनी हे घर बांधण्यासाठी त्या काळी सढळ हस्ते खर्च केला असावा. ४२ फूट लांबी व ४२ फूट रुंदीचे घर डोंगराच्या पायथ्याशी असले तरी गावातील मुख्य रस्त्यापासून सुमारे १० फूट उंचावर आहे. रस्त्यावरुन १० फूट रुंदीच्या छोटया सडकेने साधारणपणे २०० फूट अंतर चालून घराजवळ यावे लागते. मुख्यतः कोकणामधे प्रामुख्याने बांधकामासाठी वापरला जाणारा ‘जांभा दगड‘ बाहेरील भिंतीसाठी व आंतील भिंती ‘करेल‘ हा दगड व माती वापरुन घराचे बांधकाम केले आहे. जांभा दगड वापरल्यामुळे घरामधे थंडावा राखण्यास मदत होते. दुपाखी पध्दतीच्या घरामधे एक पोटमाळा होता. काळोख्या असलेल्या या माळयावर कोळीष्टके कितीही झटकून टाकली तरी पुन्हा पुन्हा धरत. पूर्वी माझ्या वडिलांची, अण्णांची चुलती, नानी व नंतर माझी काकी या पोटमाळयावर दारातील माडावरुन उतरवलेले नारळ, जुनी तांब्या पितळेची भांडी आदि ठेवत. मोठी कसरत करुन काकी शिडीवरुन या माळयावर चढत असे. लहानपणी या माळयावर जाण्याबाबत मोठे कुतूहल असे, परंतु अंधाराची व कोळीष्टकांची तसेच कधीतरी अवचित दर्शन देणाऱ्या विंचू व सरपटणाऱ्या प्राण्यांची भीती वाटे. उन्हाळयामधे थंडाव्यासाठी हे प्राणी कौलांमधे दडून रहात. पूर्वी नानी व नंतर काकीने घराच्या मागील पडवीमधे पाळलेल्या कोंबडया व त्यांची पिल्ले हा एक माझ्यासाठी आवडता खेळ असे. कोकणातील परंपरेनुसार घराची राखण देवास द्यावी लागे. आपल्या घरादाराचे रक्षण करणाऱ्या दैवतास नैवेद्य दाखविण्यासाठी मग दोन कोंबडयांचा बळी जात असे. थोडा वेळ वाईट वाटे, पण कोंबडयांच्या नैवेद्यावर तुटून पडताना कोंबडी मेल्याचे दुःख कोठे जात असे कुणास ठाऊक ! आजही हा राखण देण्याचा कार्यक्रम दरवर्षी संपन्न होतो.

देवाला न चुकता राखण देणाऱ्या नानीने देवाच्या सोबतीने या घराचे रक्षण केले. मुंबईतील वाडीया हॉस्पिटलमधे नोकरी करणारे, अण्णांचे चुलत भाऊ रघुनाथ व एस.टी. मधे नोकरी करणारे दुसरे चुलत बंधू मनोहर हे त्यांच्या कुवतीनुसार घराची किरकोळ दुरुस्ती करीत. आर्थिक परिस्थिती ओढाताणीची असल्याने अण्णांना, आम्हा भावंडाना दरवर्षी सुट्टीमधे गावाला नेणे शक्य होत नसे. गाडी-भाडयाचे तसेच मुंबईहून गावी जाणाऱ्या चाकरमान्याने गावी न्यावयाच्या जिन्नसासाठीचे पैसे गाठीशी जमा झाल्यावर गावी जाण्याचा बेत जमून येई ! मग परळ नाक्यावरच्या चौगुले स्टीम शिपच्या ऑफीससमोर त्या वेळी स्वस्त म्हणून परवडणाऱ्या बोटीच्या तिकीटासाठी रांग लावावी लागे. बोटीवरच्या खालच्या डेकवर मोठया मुश्किलीने गर्दीमधे जागा मिळे. सर्वत्र पसरलेला घामट, कुबट वास, आजूबाजूला सुरु असलेली ओका ओक, क्वचित प्रसंगी जागेवरुन कर्कश आवाजांमधे सुरु असलेली भांडणे, या साऱ्यावर ‘घराची ओढ‘ मात करीत असे. पुढे बंदरात उतरल्यावर, बैलगाडीतून घराच्या दिशेने जाताना मन हुळहुळुन गेलेले असे. त्या काळी वीज

घरापर्यंत पोहोचली नसल्याने, नानी वात मोठी केलेला कंदील हातात घेऊन घरातून बाहेरच्या वाटेपर्यंत येई. मिणमिणत्या कंदीलाच्या प्रकाशात तिचा सुरकुतलेला चेहरा उजळून निघे. घराच्या पुढील पडवीतून ओटीवर दोन पायऱ्या चढून जावयास लागते. ओटीवरुन माजघरामधे म्हणजे मधल्या खोलीमधे जाण्यासाठी फणसाच्या लाकडापासून बनविलेल्या जाडजूड फ्रेमच्या दरवाजातून जावे लागे. या दरवाजाच्या बाजूलाच गणपतीची खोली होती. या खोलीमधेच दरवर्षी गणपती विराजमान होत असे. बाकी वर्षभर ही खोली जवळ जवळ बंदच असे. याच खोलीमधे, घरातल्या महत्वाच्या कागदपत्रांची लोखंडी ट्रंक होती. या ट्रंकमधेच जुने फोटोही ठेवलेले होते. एके दिवशी ही ट्रंक कुतूहलाने उघडून पहाताना मला स्मृतींचा ठेवा गवसला. १९४० पूर्वी अण्णांनी मुंबईतून गावी घरी पाठविलेल्या पत्रांतून मला त्या काळातले अण्णांचे भावविश्व व नातेसंबंधाच्या अनेक गोष्टी समजल्याने मी हरवून गेलो. मधली खोली ही प्रामुख्याने घरातल्या स्त्रियांच्या वापरासाठी होती असे अण्णा सांगत. घरातील स्त्रिया अण्णांच्या आजोबाच्या म्हणजे कै. जीवनरावांच्या आदरयुक्त दराऱ्यापोटी ही मधली खोली ओलांडून ओटीवर येत नसत. ओटीवरच्या खांबाला टेकून पानसुपारीचा नक्षीदार पितळी डबा समोर ठेवून बसलेली अण्णांची आजी सुनांवर व नातवंडांवर घारीच्या नजरेने लक्ष ठेवून असे. सुनांना समजू नये यासाठी कर्नाटकात शिकलेल्या कानडी भाषेत आजोबांचे व आजीचे संभाषण वा वाद चाले, असे अण्णा सांगत. या मधल्या खोलीच्या डाव्या बाजूला असलेल्या पडवीचा उपयोगही घरातील स्त्रिया करीत. मधल्या खोलीच्या उजव्या कोपऱ्यातून असलेल्या दरवाजातून पायऱ्या उतरुन घराच्या मागील बाजूच्या पडवीत जाता येत असे. या पडवीमधे एक छोटी मोरी होती. तेथे घरातील स्त्रिया आडोसा करुन आंघोळ व कपडे धुणे करीत. पडवीमधे, आंघोळीकरीता पाणी तापविण्यासाठी चूल होती. चुलीच्या धुराने पडवीच्या उतरत्या छपराची कौले व वासे काळेकुट्ट पडले होते. चुलीवर ठेवलेले तपेलेही कायमचे काळेकुट्ट पडले होते. बाजूच्याच तांब्याच्या मोठया घंगाळातून चुलीवरल्या  तपेल्यात पाणी ओतावे लागे. जुन्या काळाच्या अनेक खुणांपैकी हे तांब्याचे घंगाळ ! या घरातील सर्व घटनांचे साक्षीदार ! पडवीतून घराच्या मागील बाजूस गेल्यावर तेथे केळीचे घड लोंबणारी केळी आनंदाने स्वागत करीत. चार सहा पपईची झाडे, छोटया मोठया पपयांनी  लगडून गेलेली असत. तेथेच मोकळया जागेमधे पावसाळयांत काकी, पालेभाज्या, भेंडी, वाली व इतर पावसाळी भाज्या पिकवत असे. बाजारातून आणलेल्या भाज्यांऐवजी या परसदारीच्या भाज्यांमुळे गणपतीच्या सणासुदीच्या दिवसांमधे जेवण लज्जतदार होई. घरामधला जवळ जवळ एक तृतियांश भाग हा स्वैंपाक घराला दिलेला होता. मुंबईतल्या १० X १२ च्या खोलीमधे  वावरणाऱ्या माझ्या मुंबईकर आईला या स्वैंपाक घराचे मोठे कौतुक होते. एवढया मोठया स्वैंपाक घरामधे एकटयाच वावरणाऱ्या नानीच्या हातच्या, माशाच्या कालवणाला एक वेगळीच सुंदर चव होती.

कमीत कमी साहित्याचा वापर करुन बनविलेल्या या माशांच्या कालवणाची चव, नानीच्या हाताची ? फडफडीत ताज्या माशांची की दारामधे असलेल्या विहीरीच्या पाण्याची ? याचा शोध मला प्रयत्न करुन लागला नाही. पण गांवी गेल्यावर, मुंबईमधे कधीही न मिळणाऱ्या, खाडीतील व ज्यांना 'खडपी मासे' म्हणून ओळखले जाते त्या समुद्रातील खडकांमधे सापडणाऱ्या कालापा, कुंभारु, ताऊज या ताज्या फडफडीत माशांचा शोध घेण्यासाठी सकाळीच बाहेर पडण्याचा क्रम मात्र चुकला नाही. हे चवदार मासे विकत घेऊन घरी आल्यावर घरातल्या चुलीवरुन सुटलेला स्वैंपाकाचा दरवळ, स्वैंपाकघरामधे सारख्या फेऱ्या मारायला लावी.

घराच्या आजूबाजूचा परिसर हिरवाईने नटलेला आहे. पूर्वी लावलेल्या उंच उंच माडांबरोबरच, अलीकडच्या काळामधे लावलेले फार उंच न वाढणारे माडही नारळाने सजलेले दिसतात. १९७० च्या दशकामधे झालेल्या वादळामधे घराच्या भोवतीची आंब्याची झाडे उन्मळून गेली होती. अण्णांनी पुन्हा तेथेच जिद्दीने लावलेली आंब्यांची कलमे आता आंब्याच्या मोसमामधे लगडलेली असतात. समोरच असलेले चिकूचे झाड, नेहमीच चिकूनी भारावलेले असते. दिवस उजाडतो तो या झाडावर गप्पांचा फड मांडून बसलेल्या पक्ष्यांच्या किलबिलाटाने ! अण्णांनी दारातल्या तुळस वृंदावनांवर फुलांची सतत बरसात व्हावी म्हणून लावलेला 'पारिजात' अंगणामधे सुगंधाची पखरण करीत अनेक वर्षे उभा आहे. गावी गेल्यावर न चुकता गणपतीपुळयाला जाणे व येताना मंदिराबाहेरच्या फुलझाडांच्या दुकानातून फुलझाडे घेऊन येणे, या माझ्या व माझ्या पत्नीच्या परिपाठामुळे विविध रंगाच्या जास्वंद फुलांची झाडे व इतर फुलझाडांची गर्दी झाली आहे. पूर्वी घराच्या भोवताली असलेली पेरु, रामफळ, सीताफळ व मुख्य म्हणजे घराच्या उजव्या बाजूला पूर्वी असलेला 'फणस' ही झाडे मात्र एकदा उन्मळून वा सुकून गेल्यानंतर अनेकदा प्रयत्न करुनही लावता आली नाहीत. घराभोवतालच्या परिसरावर नजर टाकताना जुन्या काळातील, निसर्गाने दिलेल्या या समृध्दीच्या अण्णांनी सांगितलेल्या आठवणी जाग्या होतात.

घरावर नुसती नजर टाकली तरी हे घर एका संपन्न माणसाचे घर असावे याची खात्री पटत असे. अण्णांचे आजोबा जीवनराव सावंत यांची सात मुले, सात सुना व त्यांची मुले असे हे भरलेले घर अचानक रिकामे झाले. जीवनरावांच्या डोळयादेखत त्यांची मुले एका पाठोपाठ गेली. सुनाही गेल्या. कुण्या दैवताचा कोप झाला की हातून काही पाप घडले ? जीवनराव, या घरासारखेच उन पाऊस झेलत उभे राहिले. जीवनरावांच्या मागे त्यांच्या पत्नीने म्हणजेच अण्णांच्या आजीने खंबीरपणे घराची धुरा सांभाळली. मागे राहिलेल्या सुनांना, नातवंडांना धीर दिला. परंतु हळू हळू नातवंडे देखील कुणी मुंबईमधे, कुणी आपल्या आजोळी तर कुणी कर्नाटकमधे निघून गेली. घरामधे त्या

काळामधे घडविलेले घरातल्या गृहलक्ष्मींसाठीचे दागिने पितळेच्या डब्यामधे घालून तो डबा आंब्याच्या झाडाखाली, चोरीच्या भीतीने पुरुन ठेवला होता. घरातलाच कुणी तरी हा डबा घेऊन आपले नशिब अजमावण्यासाठी परागंदा झाला तो पुन्हा परतलाच नाही. घरचे वैभव अशा पध्दतीने पूर्णपणे लयास गेले. याच काळामधे सुमारे १६–१७ वर्षाच्या अण्णांनी 'धारेवरच्या' म्हणजे ज्या डोंगराच्या पायथ्याशी घर आहे त्या डोंगराच्या माथ्यावर उंच झाडावर तिरंगा फडकवला. ब्रिटीश पोलीसांचे लक्ष या गावाकडे व आमच्या या घराकडे गेले व अण्णा देखिल घर सोडून मुंबईत दाखल झाले. पुढे गिरणी कामगार म्हणून मुंबईमधे चरितार्थास सुरुवात करणारे अण्णा स्वातंत्र्य आंदोलनामधे व लाल बावटयाच्या कामगार चळवळीमधे सक्रीय झाले. पूर्वी 'जीवनरावांचे घर' नंतर 'मोडयावरच्या नानीचे' घर, आता 'स्वातंत्र्य सैनिक कॉ.पी.जी.सावंतांचे घर' म्हणून ओळखले जाऊ लागले. एव्हाना घराची अवस्था फारच वाईट झाली. आर्थिक परिस्थिती बेताची असतानाही, मोठया जिद्दीने अण्णांनी घराची दुरुस्ती करण्याचा निर्णय घेऊन आपल्या चुलत भावंडांना साद घातली. रत्नागिरीतल्या पाली येथे आपल्या आजोळी जाऊन तेथेच स्थायिक झालेले व धंद्यामधे नांव व पैसा कमावलेले अण्णांचे चुलत भाऊ गजानन हिरीरीने पुढे सरसावले. घराची डागडुजी केली. जुने नळे काढून, मंगलोरी कौले चढवली. भिंतीना गिलावा केला. मधल्या खोलीच्या डाव्या बाजूची भिंत कोसळलेली पडवी दुरुस्त केली. ओटीवर तसेच दर्शनी भागामधे व गणपतीच्या खोलीला नक्षीदार लाद्या बसविल्या. मुख्य म्हणजे काही ठिकाणी काचेची कौले बसवली. भरपूर उजेड व खेळती हवा या मुळे घर पुन्हा आनंदाने बहरुन गेले. जसा मायेचा हात फिरवावा तसा अण्णांचा हात घरावरुन आपुलकीने फिरला ! थकलेल्या नानीचे मन भरुन पावले. एस.टी. च्या नोकरीनिमित्त कणकवलीस रहाणाऱ्या काकांनी, निवृत्तीनंतर या घरामधे राहण्याचा निर्णय घेतला आणि पुन्हा एकदा घराला घरपण लाभले. गणपती, शिमग्यानंतर घरी येणारी नवलाई–पावणाईची पालखी, मे महिन्याची सुट्टी अशा अनेक निमित्ताने आम्हा कुटुंबियांची पावले घराकडे वळू लागली, मित्रमंडळी, महाबळेश्वर, माथेरान अशा निसर्गरम्य ठिकाणी सुट्टी घालवीत असताना, माझ्या मुलांचा समरजित व अनिकेत यांचा हट्ट मात्र गावच्या या भुरळ घालणाऱ्या घरी जाण्याचा असे.

घर पुन्हा भरलेले दिसू लागले. अंगणात चिमुकली पावले उमटू लागली. तुळस वृंदावनासमोर नेमाने निरांजन तेवू लागले. गणपतीच्या आगमनाच्या वर्दी बरोबरच पडवीतल्या एका छोटया खोलीमधे भाडेकरु म्हणून रहावयास आलेल्या, परंतु आम्हा साऱ्यांइतकेच या घरावर प्रेम करणाऱ्या सुभाषची व त्याच्या आईची लगबग सुरु झाली. अंगण सारवून घेण्यास आता शेण मिळत नाही ही सुभाषच्या आईची तक्रार असे. जीर्ण झालेले छत व मखर सजविण्यासाठी सुभाषची रात्र जागणे सुरु होई.

प्रत्येक खेपेस घरी गेल्यावर काकीच्या तक्रारी व सूचनांमधे वाढ व्हावयास लागे. कसेही करुन घर पुन्हा दुरुस्त व्हावे हा काकीचा रोख होता. प्रश्न वेळेचा होता, परंतु कंबर कसली. आठवडयातून दोन दिवस कधी शनिवार व रविवार तर कधी सुट्टीला जोडून गांवी घरी जायचा निर्णय घेतला. घराच्या मूळ ढाच्यामधे बदल न करता व फारसे पाडकाम न करता घराचा चौथरा, ओटी व पडव्या होत्या तशाच ठेवून घराला आधुनिक रुप द्यायचा निर्णय पक्का झाला. घराच्या बाहेरील भिंतीची उंची वाढवावी व शक्य झाल्यास घराचे मधले छप्पर वर उचलून वर एक सुमारे २० फूट X २० फूट वरचा मजला उठवावा असे ठरले, गच्ची असल्यास फारच उत्तम! माझा बेत मी माझ्या आर्किटेक्ट मित्राच्या कानावर घातला, एक सुंदर प्लॅन तयार झाला. घर बांधण्याचे कंत्राट घेणाऱ्यांच्या अनेक सुरस कथा ऐकल्या होत्या. मुंबईहून घराचे काम करण्यासाठी येणाऱ्या अनेकांना सुताराने पाचर मारल्याच्या व गवंडयाने चुना लावल्याच्या कहाण्या ऐकून मी सावधगिरी बाळगून होतो. बांधकाम व्यवसायामधे रत्नागिरीमधे चांगले नाव कमावलेल्या विरेंद्र वणजू या मित्राने वेळोवेळी मार्गदर्शन केले. बांधकाम साहित्य योग्य भावाने मिळवणे, पसंतीच्या टाईल्स्, खिडक्या व दरवाजे बनवून घेणे यासाठी माझा मेहुणा सुहास सावंत त्याची मोटरसायकल घेऊन हजर असे. धावपळ होत असे, परंतु त्यामधेही एक वेगळी मजा होती. दसऱ्याच्या मुहूर्तावर सुरु झालेले काम, मे महिन्याच्या मध्यावर संपले. गणेश पूजन केले व घरामधे पुर्नप्रवेश केला.

फिका गुलाबी व पांढरा शुभ्र रंग, दर्शनी भागाच्या भिंतीच्या थोडया भागाला गडद लाल रंग. छपरावरची लाल चुटूक मंगलोरी कौले, दर्शनी भागाला व गच्चीला नक्षीदार लोखंडी काळा कठडा, रंग संगती जमून आली. घराच्या वरच्या मजल्यावर, थोडक्या जागेत बसवलेला जिना, ओटीवर हलकी पिवळसर छटा असलेल्या गालीचा डिझाईनच्या टाईल्स्, पडवीला मात्र गडद चॉकलेटी रंगाच्या टाईल्स्, घरामधे अन्यत्र संगमरवराशी नाते सांगणाऱ्या शुभ्र टाईल्स् यांनी घराच्या आंतील बाजूला शोभा आणली. ओटीच्या दर्शनी भागाच्या दोन सिमेंट कॉंक्रीटच्या खांबामुळे पडलेल्या तीन भागांना कमानीची नक्षी लक्ष वेधून घेते. मुंबईच्या, मित्रमंडळीनी कुटुंबासह निसर्गरम्य कोकण पहावयास यावे व कोकणाचे कौतुक करावे असे मनापासून वाटते, म्हणून, घराच्या पुढील पडवीत एक खोली, आवश्यक सोयी करुन पाहुण्यांसाठी सज्ज केली. गणपतीची खोली काढून टाकून, प्रशस्त केलेल्या ओटीवर आता गणपती बसू लागला व घराबाहेरुन जाणाऱ्यांना दर्शन देऊ लागला. प्रवेशद्वारातून आत येताना, डाव्या हाताला असलेला खडबडीत वाटोळया जांभ्या दगडाचा गडगा दारातील तुळस वृंदावन, अंगणामधे शेणाने सारवण्याची जमीन, आदि कोकणातील घराचा बाज कायम राखणाऱ्या बाबीना मात्र हात लावला नाही. स्वैंपाक घरामधे सर्व आधुनिक सुविधा,

२४ तास पाण्याची सुविधा, आधुनिक पध्दतीचे घराच्या मागील बाजूस बांधलेले प्रशस्त 'बाथरुम'. यामुळे उरल्या सुरल्या गैरसोयी दूर झाल्या. घर सजले आणि सर्वांच्याच कौतुकास पात्र ठरले. घरातला एक सदस्य 'बॉबी' कुत्र्यानेही घरभर हुंदडून आपला आनंद व्यक्त केला.

आज अंगणामधे दोन माडांमधे बांधलेल्या झुल्यामधे विसावून, रात्रीच्या नीरव शांततेमधे, समुद्राच्या गाजेचे संगीत ऐकत, झावळयातून डोकावणाऱ्या चंद्राच्या प्रकाशात न्हाऊन गेलेले घर, डोळयांमधे 'घर' करुन रहाते. या घराने प्रारंभी वैभवाचे दिवस पाहिले. नंतर ते दिवस सरले, घराने मूकपणे अश्रूही ढाळले, मात्र घरातल्या जुन्या सागवानी देव्हाऱ्यातल्या कुलस्वामिनीने पुन्हा घराकडे वळलेल्यांच्या पदरात समृध्दीचे माप टाकले. असे 'जीवन' रावांचे घर त्यांच्या नातवाने पांडुरंगाने पुन्हा उर्जितावस्थेत आणले. जीवनाचे अनेक विध रंग दाखविणाऱ्या व स्वतःही पहाणाऱ्या, या मोहक घराचे नांव ठेवले – 'जीवन–रंग'.

**अजित सावंत**
**E-mail: ajitsawant11@yahoo.com**
मो.: ९८२०० ६९०४६